स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन या विषयातील

पीएच.डी. शोधप्रबंधाचा अंतिम शोध सारांश

: संशोधनाचा विषय :

" आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासात लोक प्रशासनाची भूमिका: विशेष संदर्भ नांदेड जिल्हा"

संशोधक

श्री कोंकटवार बालाजी लक्ष्मण

लोकप्रशासन संशोधन केंद्र

देगलूर महाविद्यालय, देगलूर

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ.बी.आर. कत्तुरवार

विभाग प्रमुख,लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र,

देगलूर महाविद्यालय, देगलूर ता.देगलूर जि.नांदेड

मार्च 2022

“ आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासात लोक प्रशासनाची भूमिका: विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”

पीएच.डी. शोधप्रबंधाचा अंतिम शोध सारांश

अनुक्रमणिका

प्रकरण	शीर्षक	पृष्ठ क्र.
01	प्रस्तावना	01
02	नांदेड जिल्हा : एक दृष्टीक्षेप	09
03	आदिवासी विकास विभाग : रचना व कार्य	10
04	आदिवासी विकासाच्या विविध योजना	11
05	आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासात लोकप्रशासनाची भूमिकेचे विश्लेषण	11
06	निष्कर्ष व शिफारशी :-	12
	संदर्भ ग्रंथसूची	12 & 13

प्रकरण पहिले .

प्रस्तावना

जगाच्या विकास प्रक्रियेमध्ये सर्वच देश व तेथील विविध समुदाय तेथील शासन व प्रशासन व्यवस्थेच्या मदतीने आपला सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास करून घेत आहेत. सर्वच देशातील सामान्य जनतादेखील आपल्या विकासाबाबत विविध हक्कांबाबत जागरुक झाले आहेत. या विकास प्रक्रियेमध्ये भारतीय समाज व्यवस्थेतील अति प्राचीन काळापासून दरी,डोंगर खोऱ्यात वास्तव्य करणाऱ्या आदिवासी समाजाला विकासाची योग्य संधी मिळालेली नाही. आदिवासी समाजातील सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी आता शासन व प्रशासनाला जाणीव झाली आहे. त्यादृष्टीने केवळ भारतातच नाही तर सर्व आदिवासींच्या विकासासाठी जागतिक पातळीवर देखील प्रयत्न सुरू झाले आहेत. भारत हे विकसनशील राष्ट्र असून देखील विकास प्रक्रियेमध्ये मागे राहिलेला नाही.

भारत देशात अनेक जाती, धर्म, संस्कृतीमध्ये येथील समाज व्यवस्था विभागलेल्या आहेत. यामध्ये आदिवासी समुदाय हा आपल्या वेगळ्या चाली, रीती, संस्कृतीमुळे ओळखला जातो. भारतामध्ये आदिवासी समुदाय हा मोठ्या प्रमाणात आहे परंतु ज्या प्रमाणात इतर समाजाचा विकास झाला आहे. त्याप्रमाणात आदिवासी जमातीचा सर्वांगीण विकास झालेला नाही. आदिवासी समाज हा मुख्य समाजापासून दूर मागास राहिला आहे. आदिवासी समाज हा दारिद्र्य, उपासमार, वेटबिगारी, गुलामगिरी समस्यांनी जखडलेला दिसतो. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित आहेत. भारत स्वतंत्र होवून ७१ वर्ष झाले तरी देखील आदिवासी समाजाच्या समस्या या काही कमी करता आल्या नाहीत.परंतु या विकसनशीलतेच्या परिणामाची तीव्रता कमी करण्यासाठी भारतीय संविधानात आदिवासीच्या विकासासाठी विशेष तरतूदी करण्यात आल्या आहेत.

भारतीय राज्यघटना भारतीय समाजातील आदिवासी विकासातील महत्वाची आधारस्तंभ आहे. परंतु आजही भारतामध्ये आदिवासी समाजाचे जीवनमान सुधारलेले नाहीत. त्यांच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनाने अनेक योजना, कार्यक्रम, अभियान, संस्था किंवा मंडळाची स्थापना केली आहे. आज आदिवासी भागातील नागरिकांच्या विकास आणि त्यांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशासनातील अनेक घटक जबाबदारीने कार्य करीत आहेत. त्याच पैकी एक म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. भारतातील स्थानिक प्रशासनाला प्राचीन व गौरवशाली इतिहास लाभलेला आहे.

आदिवासी कोणाला म्हणावे ? आदिवासी समाजाला इंग्रजीमधील tribal याचा अर्थ जमात किंवा जमाती असा होतो. आर्यांच्या आक्रमणानंतर दऱ्याखोऱ्यात डोंगराळ भागात किंवा जंगलात निवास करणारे लोक म्हणजे आदिवासी होय. डॉ. व्हेरियर इलिवन आणि ठक्कर बाप्पा यांनी आदिवासींना aboriginal म्हणजे मूळचे रहिवासी म्हणून संबोधले आहे.

इंपिरियल गॅझेट :- आदिवासीच्या समान बोलीभाषा, बोलणाऱ्या एकाच भूभागात राहणाऱ्या सुरुवातीस अंतरविवाहित असण्याची शक्यता असणाऱ्या पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाद नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबाच्या समूहाला आदिवासी सामाज असे म्हणतात.

गीलिन. :- “एक समग्र विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान संस्कृती जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाच्या समूहाला आदिवासी म्हणतात.”

बोगार्ड्स :- सुरक्षिततेची गरज, रक्त्संबंधाचे बांध, समान धर्म यावर आदिवासी समुदाय आधारलेली आहे

संशोधनाचे महत्त्व :-

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये लोकप्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आदिवासीच्या आर्थिक विकासात येथील प्रशासन व्यवस्था कितपत आली जबाबदारी पार पाडत आहे? हे पाहणी आदिवासींच्या विकासात लोकप्रशासनाचे महत्त्व, भूमिका आदिवासी कल्याणासाठी आदिवासी

समाज कल्याणाची रचना, त्यांचे कार्य यांचा आढावा घेणे, आदिवासी विभागामार्फत राबविलेल्या योजनांचा परिणाम झाला ते अभ्यासणे या योजनांमुळे आदिवासी मध्ये बदल झाला का ? शैक्षणिक सुधारणा झाली का ? आदिवासींना कोणकोणत्या अडचणी व समस्या आहेत ? हे अभ्यासणे या सर्व बाबींचा आढावा घेण्याचा प्रयत्न या संशोधन विचार करण्यात आला आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्हा हा सामाजिक -आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या मागास म्हणून ओळखला जातो. यात संपूर्ण नांदेड जिल्ह्याचा समावेश केलेला आहे. कोणत्याही सामाजिक विषयावर संशोधन करीत असताना असंख्य मर्यादांना सामोरे जावे लागते. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समाज हा मोठ्या प्रमाणावर असून सध्या क्षेत्र हे व्यापक आहे. यासाठी प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासाचा अभ्यास करण्यात आला आहे. यामुळे या विषयाचे अभ्यास अधिक सूक्ष्म पद्धतीने व्हावा आणि अभ्यास विषयाला योग्य न्याय मिळेल या दृष्टीने नांदेड जिल्हा अभ्यासासाठी निवडून सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

1. आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासात लोकप्रशासनाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

2. आदिवासी समाजाच्या आर्थिक विकास प्रक्रियेतील विविध घटकांची भूमिका जाणून घेणे.

3. आदिवासी विकासासाठी असलेल्या विविध योजनांचा आढावा घेऊन आदिवासी संस्कृतीच्या विकासात संदर्भात लोकप्रशासनाच्या भूमिकेचा अभ्यास करणे

4. आदिवासी विकासाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी दोष किंवा उणिवा शोधून काढणे.

संशोधनाची गृहतिके :-

1) आदिवासी समाजाची आर्थिक उद्दिष्टे व विकास साध्य करण्यात लोक प्रशासनाची भूमिका महत्त्वाची आहे.
2) आदिवासी समाजाच्या विकासासाठी लोकप्रशासन राबवित असलेल्या योजनांमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा अभाव आहे.
3) लोकप्रशासनामार्फत आदिवासी कल्याणाची कामे करीत असताना शेवटच्या आदिवासी वर्गापर्यंत योजना पोहंचत नाहीत.
4) आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी असलेल्या विविध योजना औपचारिकपणे राबविल्या जातात.
5) लोकप्रशासन व्यवस्थेमार्फत आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या विविध योजनांची अमलबजावणीच्या कामात स्थानिक जनतेचा सहकार्य मिळत नाही.
6)

संशोधन पद्धती :-

सदर संशोधन कार्यासाठी संशोधन पद्धती पुढील प्रमाणे वापरण्यात आली आहे.

संशोधनाचे शीर्षक :-

“ आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासात लोकप्रशासनाची भूमिका” विशेष संदर्भ नांदेड जिल्हा.”

संशोधन पद्धतीचे स्वरूप :-

संशोधनाचे स्वरूप हे सामाजीक शास्त्र पद्धतींचे आहे. या संशोधनात वर्णात्मक व विषेशात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. या अनुषंगाने प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा वापरही अध्यांनासाठी करण्यात आलेला आहे.

तथ्य संकलन :-

तथ्य संकालनासाठी दोन स्त्रोत उपयोगात आणले आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

१) प्राथमिक स्त्रोत :-

१) अवलोकन (observation)

२) मुलाखत (Interview)

३) प्रश्नावली (Questionnaire)

इत्यादीच्या माध्यमातून तथ्य संकलीत करण्यात आले आहेत.

२) दुय्यम स्त्रोत :-

द्वितीय तथ्य सामग्रीत प्रकाशित किंवा अप्रकाशित दस्तऐवज जो विविध वेबसाईटच्या माध्यमातून सहज उपलब्ध झाले आहे. विविध वर्तमानपत्रातील बातम्या, पत्रव्यवहार(Letters), आठवणी (Memories),सार्वजनिक प्रलेख, शासकीय व अशासकीय संस्थाचे अहवाल. विद्यापीठात सादर केलेले शोधप्रबंध, त्याच बरोबर साप्ताहिके, मासिके, विशेषांक यांचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात आला आहे. तसेच इलेक्ट्रोनिक प्रसार माध्यामाद्वारे (दुरदर्शन, आकाशवाणी, इन्टरनेट,फेसबुक व्हाटस अप) प्रसारित होणाऱ्या माहितीच्या आधारे तथ्य संकलित करण्यात आले आहेत.

समस्या सुत्रण :-.

आदिवासी समाजाच्या विकास प्रक्रियेमध्ये अनेक घटक जबाबदारीने कार्य करीत आहेत. इतर अनेक घटकापैकीच सर्वात महत्वाचा घातक म्हणून लोकप्रशासनदेखील यांच्या कल्याणासाठी जबाबदारीने आपली भूमिका पार पाडणे आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट,माहूर हिमायत नगर व बिलोली देगलूर या भागातील आदीवासी समाजाच्या विकासात प्रशासन कशा पद्धतीने कार्य करीत आहे ? हे अभ्यासण्याच्या हेतूने सदर विषयाची निवड करण्यात आली आहे. याच दृष्टिकोनातून लोकप्रशासन आदिवासीच्या कल्याणासाठी कोणकोणती भूमिका पार पाडत आहे ? कोणते कार्य त्यांच्या आर्थिक विकास साधण्यासाठी करीत आहे ?

त्यात त्यांना कोणती अडचणी आहेत काय ? त्यांची स्थिती लोकप्रशासनाच्या भूमिकेमुळे सुधारली आहे काय ? अशा अनेक प्रश्नांची उकल करण्यासाठी या संशोधनाची मदत मिळणार आहे.

संशोधन विषयाची निवड :-

आदिवासी समाज हा समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असून आर्थिक दृष्ट्या इतर समाजाच्या तुलनेने अविकसित आहे. अनेक संशोधकांनी त्यांच्या सामाजिक व आर्थिक संस्कृतीचा जीवनासंदर्भातील संशोधन केले आहे. त्याद्वारे आदिवासी समाज व्यवस्थेचा व परिस्थितीचा आढावा घेतला असला तरी मला त्यांच्या जीवनात अनेक समस्या दिसून आल्या आहेत. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समुदायाच्या परिस्थितीवर व विकासावर लोकप्रशासन विषयात आजपर्यंत कोणतेही संशोधन न झाल्यामुळे येथील आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासाचा आढावा घेण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

नमुना निवड :-

या संशोधन विषयासाठी पुढील प्रमाणे नमुना निवड पद्धती वापरण्यात आली आहे.

निवड क्षेत्र :-

संशोधनासाठी मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याची निवड क्षेत्र म्हणून निवडलेला आहे.

नमुना निवड तंत्र :-

सदर विषयाच्या संशोधनासाठी उद्देशमुलक आणि सहेतुक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

नांदेड जिल्ह्यात एकूण सोळा तालुके आहेत. जिल्ह्यातील किनवट,हिमायत नगर माहूर बिलोली धर्माबाद व देगलूर या तालुक्यातील उद्देशमुलक आणि सहेतुक पद्धतीने निवडलेल्या एकूण 100 अधिकारी व कर्मचारी

वर्गाकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली आहे. तर काही निवडक अधिकारी वर्गाच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे जिल्हयातील 300 नागरिकांची उद्देशमुलक आणि सहेतुक पद्धतीने करण्यात आली आहे. त्यानंतर काही जागरूक नागरिक , लोकप्रतिनिधी, प्रसारमाध्यमाचे प्रतिनिधी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. तसेच प्रस्तुत प्रकरणात यापूर्वी विविध विद्यापीठात झालेले संशोधन, संदर्भ ग्रंथ व नियतकालिकात प्रकाशित लेखांविषयी साहित्य समालोचन करण्यात आले आहे. या सांखिकीय विश्लेषणासाठी तक्ते, नकाशे, आलेख याचाही वापर करण्यात आला आहे.

साहित्य समालोचन, संशोधन पद्धती, तथ्य संकलन, प्राथमिक व द्वितीयस्रोत यांचा वापर या प्रकरणात करण्यात आला आहे.

प्रकरण दुसरे

नांदेड जिल्हा : एक दृष्टीक्षेप

सामाजिक शास्त्रात कोणत्याही विषयावर शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करतांना प्रारंभी त्या विशिष्ट भूप्रदेशातील समाजव्यवस्था , शिक्षणव्यवस्था भौगोलिक स्थिती ,संस्कृती रूढी परंपरा इत्यादी घटकांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक असते, कारण प्रशासन व्यवस्थेच्या सभोवतालची सामाजिक, राजकीय,आर्थीक व भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव समग्र प्रशासन व्यवस्थेवर पडत असतो. म्हणून या प्रकरणात नांदेड जीह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी व इतर माहिती सविस्तर नमूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात पौराणीक व ऐतिहासिक वारसा लाभलेला एक महत्वाचा जिल्हा म्हणून नांदेड जिल्हा ओळखला जातो. शीख धर्मातील दहावे गुरु गोविंदसिंघ यांची समाधी (गुरुद्वारा) याच शहरात असल्यामुळे जगाच्या नकाशात नांदेड जिल्हयास विशेष महत्व प्राप्त झाले आहे. दक्षिण गंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीने जिल्हयास सुजलाम सुफलाम व समृध्द केले आहे. तसेच गोदावरी नदीच्या खोऱ्यातील नांदेड जिल्हा हे मध्यवर्ती क्षेत्र असल्यामुळे या

जिल्हयास गोदावरी नदीचे नाभिस्थान असेही म्हटले जाते. निसर्गाचे वरदान म्हणजे या जिल्हयास गोदावरी नदीसह इतर नऊ नद्या लाभल्यामुळे जलसिंचन विकासात हा जिल्हा अग्रेसर आहे.या जिल्हयातील समाज व्यवस्था , लोकसंख्या ग्रामीण व शहरी क्षेत्र याविषयीची सविस्तर माहिती प्रस्तुत प्रकरणात देण्यात आली आहे.

प्राचीन कालखंडातील जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमीची सविस्तर मांडणी करण्यात आली आहे. नांदेड जिल्हयाचे भौगोलिक स्थिती ,स्थान, अक्षांस-रेखांश, जमीन, जिल्हयाची प्रशासकीय रचना , लोकसंख्या ,वर्तमानपत्रे, साप्ताहिक व इतर नियतकालिके, शिक्षण संस्था ,न्यायव्यवस्था, महसूल प्रशासनाची सविस्तर माहिती या प्रकरणात देण्यात आली आहे.

प्रकरण तिसरे :-

आदिवासी विकास विभाग : रचना व कार्य

शोधप्रबंधातील तिस-या प्रकरणात आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विकास विभागाच्या रचनेचा अभ्यास करण्यात आला आहे पूर्वी आदिवासींचा विकास समाज कल्याण विभाग मार्फत केला जात असे परंतु त्याचा फायदा आदिवासी समाजाला झाला नसल्याने इ.स. 1992 मध्ये आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये आदिवासी विकास मंत्री, आदिवासी विकास राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग सचिव आदिवासी विकास विभाग यांची निर्मिती करून यांच्या अंतर्गत आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य आदिवासी सहकारी विकास महामंडळे मर्यादित नाशिक व आयुक्त आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य नाशिक या विभागाच्या अंतर्गत 44 अप्पर आयुक्त व 24 प्रकल्प अधिकारी कार्यालय स्थापन करून आदिवासी विकासाला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात आली या प्रशासकीय रचना यांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.

प्रकरण चौथे :-

आदिवासी विकासाच्या विविध योजना

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रशासनाद्वारे कोणकोणत्या योजना शासन स्तरावर तयार केल्या जातात व त्या कशा प्रकारे राबवल्या जातात त्यांचा अभ्यास केला आहे. या योजनांची निर्मिती आदिवासींच्या समस्यांचा आढावा घेऊन तयार करण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने आदिवासी समाज जमातीच्या मुला-मुलींसाठी शासकीय वस्तीग्रुह शासकीय अनुदानात आश्रम शाळा, आदिवासी वस्ती सुधार योजना, आदिवासी शेतकऱ्यांसाठी वीज पंप, तेल पंप व्यवसाय, शिक्षणासाठी भत्ता, दिव्यांग तथा अपंगासाठी राजीव गांधी अपघात विमा योजना, कन्यादान योजना, खावटी कर्ज योजना व विशेष केंद्रीय सहाय्य योजना इ. योजनाचा विश्र्लेणात्मक पद्धतीने अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण पाचवे :-

आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासात लोकप्रशासनाची भूमिकेचे विश्लेषण.

सदर प्रकरण संशोधन विषयाचा मुख्य भाग आहे. या प्रकरणांमध्ये आदिवासी भागात असणाऱ्या अधिकारी-कर्मचारी प्रशासनाचा त्यांचा आर्थिक विकासात कशी भूमिका पार पडत आहेत? यासंबंधी अभ्यास करण्यासाठी संशोधकांनी प्राथमिक स्त्रोतातील प्रश्नावरील, मुलाखती तसेच निरीक्षण या पद्धतीचा वापर करून तथ्य संकलित केलेले आहे. त्याचे आकडेवारी व त्यांच्या आकडेवारीचे सांख्यिकी विश्लेषण सदर प्रकरणात करण्यात आले आहे.

संशोधन क्षेत्र नांदेड जिल्हयात पुरते मर्यादित असून यात आदिवासी भागातील नागरिक व आदिवासी भागात कार्य करणाऱ्या लोकप्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांचे नमुना म्हणून निवड करण्यात आलेली आहे. यात उद्देशमूलक व सहेतुक या पद्धतीचा अवलंब केला आहे. नमुना निवड ही आदिवासी भागातील किनवट, हिमायतनगर, भोकर,माहूर बिलोली व देगलूर इत्यादी तालुक्यातील नमुना निवड करण्यात आली आहे. सदर संशोधनातील माहितीचे विश्लेषण तर

त्याच्यावर टक्केवारीच्या आधारे प्रत्येक प्रश्न व प्रश्नांचे विश्लेषण करून त्या संदर्भात शेवटी आनुमान काढलेले आहेत.

प्रकरण सहावे :-

निष्कर्ष व शिफारशी :-

सदर प्रकरण हे संशोधन विषयावरील शोधप्रबंधाचे शेवटचे प्रकरण असून यात संशोधन पूर्ण झाल्यानंतर निघालेले निष्कर्ष सविस्तर मांडण्यात आले आहेत. तसेच ग्रुहितकाचे परीक्षण करण्यात आले आहे. व त्यावर आधारित “आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासात लोकप्रशासनाची भूमिका” विशेष संदर्भ नांदेड जिल्हा.” या विषयावरील काही महत्वपूर्ण शिफारशी सादर केल्या आहेत.

Reference Books संदर्भ ग्रंथ :-

1. गारे गोविंद, आदिवासी विकास योजना, आदिवासी प्रतिष्ठान, पुणे 1999.
2. सलगरे व्ही. के. 'जिल्हाप्रशासन' कल्पना प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती, 2000
3. महाराष्ट्र शासन, वार्षिक आदिवासी उप - योजना, आदिवासी विकास विभाग, मुंबई, 2005 - 06
4. भारताचे संविधान, प्रकाशन महाराष्ट्र राज्य भाषा संचलनालयाद्वारे अनुदनित, चौथी, आवृत्ती 1993.
5. सी.के.एस. पीपल ऑफ इंडिया, सिरीज (v 1 III) शेड्युल ट्राईप, ऑक्सफर्ड युनिव्हर्स प्रेस, बॉम्बे 1942
6. चौधरी उच्छाव, महाराष्ट्रातील आदिवासीचे सामाजिक व आर्थिक जीवन आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, मार्च 1970
7. जिल्हा सामाजिक v आर्थिक समालोचन : जिल्हा नांदेड : अर्थ व सांख्यिकी संचालनालय मुंबई, महाराष्ट्र शासन 2007- 08
8. वर्मा आर.सी.सी. अनुवाद - श्रिसागर मनोजय वामन, भारतीय जमाती - काल आज आणि उदया पहिला हाऊस, नवी दिल्ली, प्रकाशन माहिती विभाग आणि

प्रसारण मंत्रालय, भारत सरकार 2003.
9. जोशी लक्ष्मणशास्त्री, संपादक, ‘ मराठी विश्वकोश खंड १०’, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, ,मुंबई,१९८९.
10. Goswami B. Constitutional safe gards for S.C. and S.T.
11. Mukharjee bhabanemada, structure and kiship in tribal india, minarva associates culcutta 1981
12. Mehta B.H tribal welfare in history and philosophy of social work concept publishing house new delhi 1961

JOURNALS

१) The Indian journal of public administration
२) Journal of advance public administration
3) योजना मराठी
४) यशमंथन
५) लोकराज्य

संशोधन मार्गदर्शक
प्रा. डॉ.बी.आर. कत्तुरवार
विभागप्रमुख,लोकशासन विभाग व संशोधन केंद्र
देगलूर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड

संशोधक
श्री कोंकटवार बालाजी लक्ष्मण
लोकशासन संशोधन केंद्र
देगलूर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड